जा.क्र./पोउआ/वाह/ ९५२८ /१७

**प्रेसनोट**

पुणे दिनांक - २४ /११/२०१७

पुणे शहरातील वाहतुक सुरक्षित व सुरळीतपणे होणेकरीता, महाराष्ट्र शासन गृह विभाग क्र. एम. व्ही. ए. ०१९६/८७१/सीआर - ३७/टीआरए - २, दिनांक - २७/०९/१९९६ चे नोटीफिकेशननुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६(१) (ए) (बी), ११६(४) आणि ११७ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करुन प्राप्त हरकती व सुचनांचा विचार करून मी शेषराव सुर्यवंशी, पोलीस उप-आयुक्त मुख्यालय-२, अति.कार्यभार वाहतुक नियंत्रण शाखा, पुणे शहर, यापुर्वी या ठिकाणी काही पार्कींग निर्बंध असतील ते रद्द करण्यात येत असुन तात्पुरत्या स्वरुपात खालील प्रमाणे आदेश निर्गमित करण्यात येत आहेत.

तरी नागरीकांनी याबाबत आपल्या काही सुचना असल्यास त्या पोलीस उप-आयुक्त, वाहतूक नियंत्रण शाखा, साधु वासवानी रोड, पुणे - १ यांचे कार्यालयात दिनांक - २४ /११/२०१७ ते दिनांक - ०८ /१२/२०१७ पर्यंत लेखी स्वरूपात कळवाव्यात. नागरीकांच्या सूचन व हरकती विचार करुन व अत्यावश्यक सेवेतील वाहने (उदा. फायरब्रिगेड, पोलीस वाहने, रुग्णवाहीका, इ.) खेरीज करून अंतिम आदेश काढण्यात येतील.

**दत्तवाडी वाहतुक विभाग पुणे अंतर्गत,**

**१) नम्रता इलेक्ट्रॉनिक कडुन एन एच ४ हायवेकडे जाताना फक्त वाहने जाण्याकरीता एकेरी वाहतुक व नम्रता इलेक्ट्रॉनिक कडुन एन एच ४ हायवेकडे जाताना सर्व वाहनांना १०० मीटर अंतरावरती नो एंन्ट्री करण्यात येत आहे.**

**२) एन एच ४ हायवेकडुन जुन्या पर्यायी रोडने नम्रता इलेक्ट्रॉनिक कडे येताना सर्व वाहने एकेरी वाहतुक व एन एच ४ हायवेकडुन येताना सर्व वाहनांना १०० मीटर अंतरावरती नो एंन्ट्री करण्यात येत आहे.**